राज्यातील आदिवासी क्षेत्रातील विद्युतीकरणासाठी लागणाऱ्या पायाभुत सुविधांतर्गत पालघर जिल्ह्यातील जव्हार-४ येथील १३२ केव्ही उपकेंद्र उभारण्यासाठी आदिवासी उपयोजनेंअंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता निधी वितरीत करण्याबाबत. (लेखाशिर्ष २८०१५०८९).

महाराष्ट शासन
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांक : निधिवि-२०१८/प्र.क्र.८/ऊर्जा-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक -: २२/०२/२०१८

वाचा -: १. उद्योग,उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय निधिवी २०१७/प्र.क्र.७१/उर्जा-४ दि.२४.०३.२०१७
२. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र. आ.वि.व. बीयुडी-२०१७/प्र.क्र.२४/कार्यासन-६, दि.०६/०२/२०१८
३. वित विभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३ दि. १८/०४/२०१७
४. वित विभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३ दि. ३०/०६/२०१७

प्रस्तावना

ठाणे जिल्ह्यातील जव्हार उपकेन्द्राच्या उभारणीसाठी लागणार निधी रु.४५.०८ कोटीपेकी ५०% निधी पुढील दोन वर्षामध्ये आदिवासी उपयोजनेअंतर्गत महापारेषण कंपनीला राज्यस्तरावर उपलब्ध करून देण्यास आदिवासी विकास विभागने मान्यता दिली आहे.त्या अनुषंगाने सन २०१७-१८ या वितीय वर्षासाठी आदिवासी उपयोजनेंतर्गत रु.१८.२२ कोटी इतकी तरतुद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे. आदिवासी विकास विभागाने संदर्भिय शासन निर्णय क्र.२ अन्वये सन २०१७-१८ या वितीय वर्षासाठी अर्थसंकल्पित निधी रु.१८.२२ कोटीच्या ७०% निधी रु.१२.७५४० कोटी वितरणास मंजूरी दिली आहे. सदर निधी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांना रोखीन वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांना पालघर जिल्ह्यातील जव्हार-४ येथील १३२ केव्ही उपकेंद उभारण्यासाठी आदिवासी उपयोजनेअंतर्गत रु.१२,७५,४०,०००/- (रुपये बारा कोटी पंच्याहतर लाख चाळीस हजार फक्त) रोखीने वितरीत करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

२. या निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या निधीची रक्कम ज्या कारणासाठी मंजूर करण्यात आली आहे त्याच कारणासाठी उपयोगात आणली जाईल याची खातर जमा करावी.

३. वरील बाबींचा खर्च मागणी क्र.टी-५, २८०१, वीज पंचवार्षिक योजनांतर्गत योजना ८०/सर्वसाधारण, ७९६-जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१)(०३) महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित यांना अनुदान (२८०१५०८९) ३५-भांडवली मत्ता निर्मितीसाठी सहाय्यक अनुदान व लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ करिता मंजूर अनुदानातून खर्ची टाकण्यात यावा.

४. सदरची रक्कम अधिदान व लेखा अधिकारी यांच्या मार्फत कोषागारातून काढून महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, मुंबई यांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्री.वि.म.राजुरकर, अवर सचिव व नियंत्रण अधिकारी म्हणून श्री.भि.य. मंता, उप सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांना मंजूर

झालेली रक्कम रु.१२,७५,४०,०००/- (रुपये बारा कोटी पंच्याहतर लाख चाळीस हजार फक्त) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई येथून महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांच्या नावे स्वतंत्ररित्या धनादेश काढून वितरित करण्याची कार्यवाही करावी.

५. वित विभागाच्या दि.१८.०४.२०१७ च्या परिपत्रकान्वये, अर्थसंकल्प अंदाज वितरण व संनियंत्रण प्रणालीवर उपलब्ध असलेला निधी कोषागारातून आहरित करण्यापूर्वी या परिपत्रका सोबतच्या परिशिष्टात नमूद केलेल्या बाबींसाठी तपासणी सूचीप्रमाणे सर्व बाबींची तसेच परिच्छेद क्र.७ ते १८ मधील प्रत्येक अटीची पूर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. या लेखाशिर्षाअंतर्गत एक वर्षापुर्वीचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

६. आदिवासी विकास विभागाने दि.०६/०२/२०१८च्या शासन निर्णयान्वये सदर निधी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यास मंजूरी दिली आहे.त्या अनुषंगाने वित विभागाच्या संदर्भिय परिपत्रकान्वये प्रशासकीय विभागाच्या अधिकारात सदर निधी वितरीत करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०९११४७०२७३१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vilas Mahadeorao Rajurkar

Digitally signed by Vilas Mahadeorao Rajurkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=83469494bac86099a320f3e14bf8421ee9d2b48e344470b76ea2595df04951b4, serialNumber=02c5c00269dd48836be0d9939bdff848a9ff1f1a9fd195baf3a104d09b0817d9, cn=Vilas Mahadeorao Rajurkar
Date: 2018.03.09 11:47:48 +05'30'

(वि.म.राजुरकर)
शासनाचे अवर सचिव

प्रत :-

१. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, प्रकाशगंगा, बांद्रा (पूर्व),मुंबई-५१
२. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
३. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज मंडळ सुत्रधारी कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
४. मा.विरोधी पक्षनेता महाराष्ट्र विधान परिषद /विधान सभा,विधान मंडळ सचिवालय विधान भवन मुंबई
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई-४००० २०.
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर
७. अधिदान व लेखा अधिकारी, (अराप/रालेवि-१) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
८. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
९. नियोजन विभाग (कार्यासन १४६१), मंत्रालय, मुंबई ४००० ०३२.
१०. अवर सचिव (रोख), उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ४००० ०३२.
११. क.अ. (प्रशासन-१), उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ४००० ०३२.
१२. वित्त विभाग/(अर्थसंकल्प-१३/साधनसंपत्ती/साऊ/व्य-१६) मंत्रालय, मुंबई-३२
१३. अवर सचिव, (कार्यासन-१६) आदिवासी विकास विभाग, , मंत्रालय, मुंबई ४००० ०३२.
१४. निवडनस्ती (ऊर्जा-३) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ४००० ०३२.